# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


महत्त्वाचे

जा.क्र.शिउसं/उमाशि-३/११ वी/पुवि/२०१६/६६९३

दिनांक :- ०८.०६.२०१६

प्रति,

**सर्व प्राचार्य/उपप्राचार्य/मुख्याध्यापक,**
**झोन प्रमुख व मार्गदर्शन केंद्र प्रमुख,**
**कनिष्ठ महाविद्यालय, व माध्यमिक शाळा,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र**

विषय :- पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांच्या इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जातील अॅप्रुव्हल (Approval) बाबत

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१६ मध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील व महाराष्ट्र राज्याबाहेरील सर्व अर्जदारांना (खुल्या संवर्गातील तसेच आरक्षाणार्थी) त्यांचा अर्ज संबधित मार्गदर्शन केंद्र प्रमुखांकडुन ऑनलाईन मान्य करुन घेणे बंधनकारक राहील. अशा सर्व विद्यार्थी व पालक यांनी संबधित झोन केंद्र /मार्गदर्शन केंद्रावर पुढील कागदपत्रे विद्यार्थ्यांनी / पालकांनी समक्ष सादर करावीत व केंद्राच्या लॉगईन (log in) मधूनच सदरचे अर्ज अप्रूव्हल केले जातील.

१. इ. १० वी चे गुणतपासणीसाठी ऑनलाईन निकालाची प्रिन्ट आऊट पाहुन व निकालाच्या (Websie) संकेतस्थळावर ऑनलाईन पाहुन खात्री करावी.

२.वैधानिक आरक्षणासाठी शाळा सोडल्याचा मुळ दाखला मिळेपर्यंत त्याऐवजी मुख्याध्यापकांनी दिलेले बोनाफाईड प्रमाणपत्र ज्यामध्ये धर्म,जात, मातृभाषा व जन्मदिनांक इ. आवश्यक बाबींचा उल्लेख असलेले बोनाफाईड तपासणीसाठी ग्राहय धरावे. फक्त वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र असल्यास अप्रुव्हल देण्यासाठी ते ग्राहय धरण्यात यावे.

३. प्रवेश अर्ज भाग-१ मधील अ.क्र. ७ मधील विशेष आरक्षणाबाबत माहिती पुस्तिकेतील सुचनांप्रमाणे आवश्यक ती प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांनी समक्ष सादर केल्यास पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगपालिका क्षेत्राबाहेरील शाळेच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज झोन केंद्र / मार्गदर्शन केंद्र यांनी तपासुन अप्रुव्ह करुन द्यावा.

४. महाराष्ट्र राज्याबाहेरील अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी माहिती पुस्तिकेतील पान क्र-२७-२८/५७-५८ वर नमुद असलेल्या केंद्रावर विद्यार्थ्यांनी समक्ष सादर केलेले कागदपत्रे तपासून प्रवेश अर्ज अप्रुव्ह (Approve) करुन द्यावा.

दिनांक १५ जून २०१६ रोजी मूळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला मिळेपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला अॅप्रुव्हल देण्यासाठी थांबवु नये अथवा परत पाठवू नये, वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे पाहुन अॅप्रुव्हल दयावे, तसेच विद्यार्थी व पालकांची कोणत्याही प्रकारची अडवणूक होणार नाही याची दक्षता झोनकेंद्र व मार्गदर्शन केंद्र यांनी घ्यावी.

MRaut 8.6.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे

11th online letter 2016